PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Galgale nighale
Year: 2008

Song: Bole manatil bhasha
Lyricist:

जरा वेडासा खुळासा
पण साधासा भोळासा
असा सरळ तिरका भोळासांब

जरा वेडासा खुळासा
पण साधासा भोळासा
असा सरळ तिरका भोळासांब
बोले मनातील भाषा
याचा थोडासा हा लोचा
याचे करू आता काय मला सांग
बोले मनातील भाषा
याचा थोडासा हा लोचा
याचे करू आता काय मला सांग

कसा दिसतो नमुना वरवर पाहताना
पण आतून वेगळा मनामध्ये डोकवाना
याला हसतात लोक
थट्टा करतात याची
जगा वेगळी तऱ्हा ही मनाशीच बोलण्याची
मन नितळ नितळ नाही इतरांसारखे
नाही मनामध्ये पाप मुखी राम राम
बोले मनातील भाषा
याचा थोडासा हा लोचा
याचे करू आता काय मला सांग
बोले मनातील भाषा
याचा थोडासा हा लोचा
याचे करू आता काय मला सांग

येई सतत सतत
याचा विचार मनात
असे जडते का काही
कुठे एकाच क्षणात
जे जे वाटतेय मला
ते ते आहे का खरंच
असे विचार का माझे
उगा उगाच बळंच
त्याच्या मनातही थोडे
असे असेल का कोडे
प्रश्न चिन्हांची पुढ्यात माझ्या रांग रांग
बोले मनातील भाषा
याचा थोडासा हा लोचा
याचे करू आता काय मला सांग
बोले मनातील भाषा
याचा थोडासा हा लोचा
याचे करू आता काय मला सांग

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*